राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये, बांधकाम विषयक कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम (PMS) ही प्रणाली राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आयटी-२०१७/प्र.क्र.४२ (भाग-३) /मातंक
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ
फोर्ट,मुंबई-४००००१
तारीख: ०६ जुलै,२०१९.

<u>वाचा-</u>

१) **या विभागाचा शा.नि.क्र. आयटी-२०१७/प्र.क्र.४२/मातंक, दि. २२ जून, २०१८.**

<u>प्रस्तावना-</u>

जिल्हा परिषदेतील बांधकाम विषयक कामांमध्ये सुसूत्रता यावी या करिता प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टिम राबविण्याचे या विभागात प्रस्तावित होते. यासाठी सीडॅक या केंद्रशासनाच्या संस्थेकडून त्यांच्याकडे तयार असलेले Work and Account Management System (WAMIS) हे ॲप्लीकेशन राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यासाठी येणाऱ्या रू. १८५ लक्ष इतक्या खर्चास या विभागाच्या दि. २२ जून, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे तसेच यासाठी सीडॅक सोबत शासनाने करारनामा केला आहे, सदर करारनाम्याची प्रत या विभागाच्या संकेतस्थळावर (https://rdd.maharashtra.gov.in/) उपलब्ध आहे. या प्रकल्पासाठी प्रायोगिक स्तरावर जिल्हा परिषद, नाशिकची निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद , नाशिक अंतर्गत बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा या प्रकल्पांसाठी प्रोजक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये कामांची नोंदणी चालू असून कामांची मोजमाप पुस्तीका नोंदविणे, देयके नोंदविणे इ. कामे या प्रणालीमार्फत सुलभतेने शक्य झाली आहेत. जिल्हा परिषद, नाशिक येथे सदर प्रणालीची यशस्वीपणे करण्यात येत असलेली अंमलबजावणी व त्याची उपयुक्तता विचारात घेता शासन आता पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमध्ये, बांधकाम विषयक कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम (PMS) ही प्रणाली उपलब्ध करण्यात येत आहे. सर्व जिल्हा परिषदांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम (WAMIS) या सुविधेचा लाभ घ्यावा व प्रशासनातील कार्यक्षमता व पारदर्शकता वाढवावी. प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम ही प्रणाली राबविण्यासाठी सर्व जिल्हा परिषदांनी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१) सर्व जिल्हा परिषदांनी सीडॅक , पुणे येथील श्रीम. वैशाली (संपर्क क्र. ९८५०६८७९२६) व श्री. कुंदन (संपर्क क्र. ९९७०३२५०७५) यांचेशी संपर्क साधावा व तसे शासनास अवगत करावे.

२) जिल्हा परिषदांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा या प्रकल्पांसाठी यूझर्सची (users) यादी तयार करावी.

३) जिल्हा परिषदांनी आपल्या कार्यालयातील उपरोक्त संवर्गातील तंत्रस्नेही अधिकारी/ कर्मचारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी, व त्यांना प्रवीण प्रशिक्षकाचा दर्जा द्यावा.

४) जिल्हा परिषदांनी या प्रकल्पासाठीची यूझर्सची (users) यादी सीडॅक, पुणे यांचेकडे पाठवावी.

५) जिल्हा परिषदांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये pilot स्तरावर एक काम निवडून ते यशस्वीरित्या पूर्ण करावे, व त्यानंतर बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा यासंदर्भातील कामे (प्रत्येकी एक काम व नंतर सर्व कामे) सदर प्रणालीमध्ये करण्यात यावीत.

६) सी-डॅक द्वारे प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममधील कामांचे नियंत्रणासाठी (monitoring) मुख्य कार्यकारी अधिकारी यांना डॅशबोर्ड उपलब्ध करावा.

७) जिल्हा परिषदांमध्ये यूझर्सला लॉगीन मिळाल्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम या प्रणालीच्या अनुषंगाने प्रशिक्षण आयोजित करावे तसेच जिल्हा परिषदांनी यासाठी प्रविण प्रशिक्षक (master trainers)तयार करावेत.

८) सर्व जिल्हा परिषदांनी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा या प्रकल्पांसाठी कामांची मोजमाप पुस्तीका प्रोजक्ट मॅनेजमेंट सिस्टीमधील संगणकीकृत पद्धतीने राबविण्याच्या अनुषंगाने शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९/ मातंक,दि. २९/०३/२०१९ ची प्रत सोबत जोडली आहे. यातील पुढील सूचनांचे पालन करण्यात यावे.

८.१) प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीमवरून प्रिंट आऊट काढून मोजमाप पुस्तीकेला लावणे शक्य आहे. यासाठी संबंधीत अभियंत्यांनी शाईने प्रिंट आऊटवर चारही बाजूंनी तिरप्या रेषा मारून साक्षांकीत करावे.

८.२) प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये कोणत्या अभियंत्याने हा डेटा सिस्टीममध्ये भरला आहे, त्याची आयडेंटिटी सिस्टीममधून उपलब्ध करावी.

८.३) तसेच प्रिंट आऊटसाठी अतिरिक्त दक्षता म्हणून प्रिंट आऊट घेऊन मोजमाप पुस्तीकेत चिटकवावी व त्यातील प्रत्येक एन्ट्री तपासून शाईने टिकमार्क/चिन्हांकीत करावी.

८.४) प्रत्येक पानावर सदर अभियंत्यांची स्वाक्षरी असेल.

८.५) संगणकीकृत प्रिंट आऊट असल्यामूळे यात कोणताही बदल झाल्यास तो निश्चीत दिसेलच. संबंधीत अभियंत्यांनी अशा सर्व/प्रत्येक बदलांच्या समोर व्यक्तीश: स्वाक्षरी करावी.

८.६) कोणत्याही प्रकारे पी.डब्लू.डी. च्या मॅन्यूअलच्या मुळ हेतूस बाधा पोहचणार नाही. याची सर्वत: दक्षता घेण्यात यावी.

२. सीडॅक, पुणे यांनी सहा विभागातील प्रत्येकी एका जिल्हा परिषदेमध्ये प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम ही प्रणाली तात्काळ राबविण्याची कार्यवाही करावी. तसेच याबाबत जिल्हा परिषदांनी शासनास अहवाल सादर करावा.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६०९५८१४६५२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Surendrakumar Gupta

Digitally signed by Aseem Surendrakumar Gupta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Developement Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f5fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Surendrakumar Gupta
Date: 2019.07.06 15:33:28 +05'30'

(असीम गुप्ता)
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.
२. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. सचिव , मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. सचिव , (मु.ग्रा.स. यो.), ग्रामविकास विभाग, मुंबई
५. सर्व सह सचिव/ उपसचिव, ग्रामविकास विभाग, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
८. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी , जिल्हा परिषद, (सर्व).
९. संचालक, प्रगत संगणक विकास केंद्र (सीडॅक), सीडॅक इनोवेशन पार्क, पंचवटी, पाषाण, पुणे-४११ ००८.
१०. निवड नस्ती व बजेट नस्ती (माहिती तंत्रज्ञान कक्ष), ग्रामविकास विभाग , मंत्रालय.मुंबई

महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१९/मातंक
ग्रामविकास विभाग, मंत्रालय,
२५,बांधकाम भवन,मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दि. २९.०३.२०१९

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक.

विषय :- जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा या प्रकल्पांसाठी कामांची मोजमाप पुस्तीका प्रोजक्ट मॅनेजमेंट सिस्टीमधील संगणकीकृत पद्धतीने राबविण्याबाबत.

संदर्भ:- आपले उपरोक्त विषयाबाबतचे अ.शा.पत्र क्र. ३७/१९ दि. १९.०३.२०१९

महोदय,

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीम अंतर्गत बांधकाम, लघू पाटबंधारे, ग्रामीण पाणीपुरवठा या प्रकल्पांसाठी कामांची मोजमाप पुस्तीका प्रोजक्ट मॅनेजमेंट सिस्टीम या संगणकीकृत पद्धतीने राबविण्याबाबतच्या आपल्या प्रस्तावाबाबत मा. प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. यांनी पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत.
या प्रकल्पातील कामांसाठी, प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीमवरून प्रिंट आऊट काढून मोजमाप पुस्तीकेला लावणे योग्य असून, पुढीलप्रमाणे पद्धत अवलंबण्यात यावी.

१. प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये कोणत्या अभियंत्याने हा डेटा सिस्टीममध्ये भरला आहे, त्याची ओळख (आयडेंटिटी) सिस्टीममध्ये असने क्रमप्राप्त आहे.
२. संबंधीत अभियंत्यांनी डेटा प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये भरावा. त्याची पी.डी.एफ. फाईलची प्रिंट आउट काढुन मोजमाप पुस्तिकेमध्ये चिकटवावा. त्यानंतर शाईने प्रिंट आऊटवर चारही बाजूंनी तिरप्या रेषा मारून साक्षांकीत करावे.
३. अतिरीक्त दक्षता म्हणून प्रिंट आऊट प्रत्येक एन्ट्री तपासून शाईने टिकमार्क/चिन्हांकीत करावी.
४. प्रत्येक पानावर सदर अभियंत्यांची स्वाक्षरी असावी.

५. संगणकीकृत प्रिंट आऊट असल्यामूळे यात कोणताही बदल झाल्यास तो निश्चित दिसेलच. कोणताही बदल करावयाचा असल्यास तो बदल आधी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टीममध्ये करावा व प्रिंट काढावी या संगणकीकृत प्रिंटमध्ये शाईने कोणताही बदल करण्यात येऊ नये.

कृपया याबाबत आपल्या स्तरावरून योग्य ती कार्यवाही करावी व त्याचा अहवाल शासनास सादर करावा, ही विनंती.

आपला विश्वासु,

(प्रविण जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना माहितीसाठी.